सकाळ
पुणे, गुरुवार, ५ जून २०१४

# डॉ. बोराळकर यांना पर्यावरण भूषण पुरस्कार


डॉ. बोराळकर

पुणे, ता. ४ : महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ व एन्व्हायरलमेंटल क्लब ऑफ इंडिया यांच्यातर्फे देण्यात येणारा 'पर्यावरण भूषण' पुरस्कार यंदा पर्यावरण तज्ज्ञ डॉ. दिलीप बोराळकर यांना जाहीर झाला.

क्लबचे सचिव मुकुंद जोशी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. रविवारी (ता. ८) सायंकाळी पाच वाजता मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स, सेनापती बापट रस्ता येथे पुरस्कार वितरण होणार आहे.

महाराष्ट्र टाइम्स, पुणे ■ मंगळवार, ३ जून २०१४

# पर्यावरणभूषण पुरस्कार डॉ. बोराळकर यांना जाहीर



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा पुणे विभाग आणि एन्व्हायर्नमेंटल क्लब ऑफ इंडियातर्फे देण्यात येणारा 'पर्यावरणभूषण' पुरस्कार डॉ. दिलीप बोराळकर यांना जाहीर झाला आहे. येत्या रविवारी (आठ जून) सायंकाळी पाच वाजता सेनापती बापट रोडवरील मराठा चेंबर्सच्या मुळगावकर सभागृहात पुरस्काराचे वितरण होईल. अफगाणिस्तानचे कौन्सिल जनरल अहमद बबाक, इस्त्राइलचे व्यापार प्रतिनिधी इलान डीव्हॉन,बेल्जियमच्या व्हाइस कौन्सिल पिंकी अहलुवालिया उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती मुकुंद परदेशी, गणेश शिरोडे आदींनी पत्रकार परिषदेत दिली.